# महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा
## परीक्षेसंदर्भात महत्त्वाची माहिती व मार्गदर्शन

महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेसाठी दोन प्रश्नपत्रिका असतील व त्यात दोन विभाग असतील ते म्हणजे

**१) भाषा व गणित**

**२) इंग्रजी व बुद्धिमत्ता**

### परीक्षेची पध्दत

१) प्रत्येक प्रश्नपत्रिका १५० गुणांची असेल व त्याकरिता वेळ दीड तासांचा असेल.

२) प्रश्नपत्रिकेत प्रत्येक प्रश्न २ गुणांचा असे ७५ प्रश्न असतील.

३)

| पेपर | विषय | प्रश्न संख्या | गुण | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | भाषा | २५ | ५० | ९० मिनिटे |
| | गणित | ५० | १०० | |
| **एकूण** | | **७५** | **१५०** | |
| २ | इंग्रजी | २५ | ५० | ९० मिनिटे |
| | बुद्धिमत्ता | ५० | १०० | |
| **एकूण** | | **७५** | **१५०** | |

४) सर्व प्रश्न बहुपर्यायी स्वरुपाचे असतील.

५) प्रत्येक प्रश्नास चार पर्यायी उत्तरे दिलेली असतील.(स्वतंत्रपणे दिलेल्या उत्तरपत्रिकेतील संबंधित प्रश्न क्रमांकाच्या समोरील उत्तर क्रमांक असलेले वर्तुळ पूर्णपणे रंगवावे.) वर्तुळ रंगवताना निळ्या किंवा काळ्या बॉलपेनाचाच वापर करावा. पेन्सिलने नोंदवलेली उत्तरे ग्राह्य धरली जाणार नाहीत.

**उदा.** प्रश्न क्रमांक ५ च्या उत्तराचा पर्याय क्रमांक २ असेल तर तो पुढील प्रमाणे नोंदवावा.

**प्रश्न क्र.**5) ① ② ③ ●

६) खालीलप्रमाणे नोंदवलेले उत्तर ग्राह्य धरण्यात येणार नाही, असे उत्तर लिहिल्यास शून्य गुण दिले जातील.

**उदा.** प्रश्न क्र.5) ⊛ ⊘ ◐ ● एकदा नोंदवलेली उत्तरे पुन्हा बदलता येणार नाहीत.

७) एकापेक्षा अधिक वर्तुळात नोंदवलेली उत्तरे, तसेच खाडाखोड करुन नोंदवलेली उत्तरे ग्राह्य धरली जाणार नाहीत.

८) विद्यार्थ्यांनी सर्व प्रश्न सोडवायचे आहेत. कोणत्याही क्रमाने सोडवले तरी चालतील पण प्रश्न क्रमांक व त्या प्रश्नाचे उत्तर यांचा संबंध चुकवू नका.

९) भाषा व इंग्रजी या विषयांच्या अभ्यासासाठी उत्तम वाचनाची सवय व पाठांतर आवश्यक आहे.

१०) गणित व बुद्धिमत्ता या विषयांसाठी भरपूर उदाहरणे सोडवणे व काही क्लृप्त्या लक्षात घेणे गरजेचे आहे.

**महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा** हा शिष्यवृत्ती परीक्षेसाठी उत्तम व मजबूत पाया आहे.

सराव,सराव आाणि सराव हीच उत्तम यशाची गुरुकिल्ली आहे.

सर्व विद्यार्थ्यांना आमच्या

**हार्दिक शुभेच्छा!**

# परीक्षेची तारीख : १९ जानेवारी २०२०

## प्रवेश अर्जावरील नियम व अटी

१) जानेवारी महिन्यातील शेवटून दुसऱ्या रविवारी परीक्षा घेतली जाईल.

२) प्रवेश अर्ज भरण्याची अंतिम तारीख १४ ऑगस्ट आहे. १५ ऑगस्ट नंतर रू. १०० विलंब शुल्क जादा आकारले जाईल.

३) प्रत्येक राज्यस्तरीय शिष्यवृत्ती धारकास फक्त एकदाच शिष्यवृत्ती दिली जाईल.

४) परीक्षा शुल्क परत केले जाणार नाही किंवा त्या जागी दुसरा विद्यार्थी घेतला जाणार नाही.

५) परीक्षा केंद्र जिल्हा / तालुका स्तरावर नियोजित केले जाईल, त्या करीता केंद्रावर २०० विद्यार्थी संख्या असणे आवश्यक आहे.

त्या केंद्रावर २०० विद्यार्थी नसल्यास जवळच्या केंद्रावर स्वखर्चाने जावे लागेल.

६) गुणवत्ता यादी विद्यार्थी संख्येवर अवलंबून असेल.

७) गुणवत्ता यादीचे सर्व हक्क **महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेकडे** राखीव आहेत.

८) प्रवेश अर्ज शाळांमार्फत भरावयाचे आहेत किंवा अधिकृत स्थानिक प्रतिनिधींमार्फत किंवा पुणे कार्यालयात भरण्याची सुविधा आहे.

९) परीक्षा शुल्क शाळांमार्फत भरावयाचे आहेत किंवा **महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा** या नावाने **DD** काढावयाचा आहे.

**DD** किंवा **cheque** फक्त खाजगी विद्यार्थ्यांकडूनच स्विकारले जातील.

१०) परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्याला नेण्याची व आणण्याची जबाबदारी पालकांची आहे.

११) विद्यार्थी परीक्षेच्या दिवशी अन्य कोणत्याही परीक्षेस बसला असेल तर त्याची कोणतीही दुसरी व्यवस्था केली जाणार नाही.

१२) कृपया पालकांना काही माहिती पाहिजे असल्यास किंवा तक्रार असल्यास आमच्या पत्त्यावर लेखी स्वरुपात कळवावी.